महाराष्ट्र शासन
**छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा**
Chhatrapati Sambhaji Maharaj Government Medical College and Hospital Satara,
467, Sadar bazar, Camp, Satara 415001
**Phone No 02162-299763Email id :- deangmcsatara7@gmail.com**

जा.क्र.छसंमशावैमवरुसा/कनि. जाहिरात/ ३४५० /२०२६ दि.०४/०८/२०२६

## जाहिरात

विषय- प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक व कनिष्ठ निवासी-१ २ ३ यांची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशी नुसार भरण्याबाबत.

संदर्भ: १ वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग शासन निर्णयक्र.एलईसी-२०२१/प्र.क्र१९९/वैसेवा-३ दिनांक ०९-०२-२०२२.

२ आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे परिपत्रक DMER-१३/७१/२०२५-EST२/७२५५ दि. २२/१२/२०२५

३ शासननिर्णयक्रंपदनि- २०१९/प्र.क्र./१२/भाग-१/वैसेवा -२ दि. १ फेब्रुवारी, २०२१

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या त्रृटीच्या पुर्ततेसाठी तसेच दैनंदिन रुग्णसेवा अबाधित राहण्याच्या दृष्टीने अधिष्ठाता, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा या संस्थेच्या आस्थापनेवरील अचिकित्सालयीन व चिकित्सालयीन विषयांतील रिक्त असलेली प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक व कनिष्ठ निवासी-१,२,३ यांची पदे मा.संचालनालय, मुंबई यांच्या मार्फत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीत गुणवत्तेनुसार भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्ज सादर करावयाचा कालावधी दि. ०५/ ०८/२०२६ ते दि.१८/ ०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत**

**मुलाखतीचा दिनांक व वेळ - गुरुवार दि. २०/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता**

**मुलाखतीचे ठिकाण**- मा.अधिष्ठाता दालन, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

इच्छुक उमेदवारांनी (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातून जाहिरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत अर्ज शुल्क रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) रोखपाल शाखेत भरुन अर्ज प्राप्त करुन घ्यावेत. अर्जात नमुद कागदपत्रे/ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या प्रती अर्जासोबत जोडणे अत्यंत आवश्यक आहे. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह साक्षांकीत केलेल्या प्रतींचा एक संच सोबत घेवून येणे आवश्यक आहे. उमेदवारांनी मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवारांचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

पदाचे नाव :-

प्राध्यापक-

| अ.क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता, अनुभव |
|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | २ | *As per NMC TEQ notification Dated १४/०२/२०२२ |
| २ | मनोविकृती शास्त्र | १ | |
| ३ | क्षयरोग व उररोगशास्त्र | १ | |
| ४ | कान, नाक, घसा शास्त्र | १ | |
| ५ | क्ष- किरणशास्त्र | १ | |
| ६ | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र | १ | |
| | एकूण | ०७ | |

सहयोगी प्राध्यापक-

| अ.क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता, अनुभव |
|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | २ | *As per NMC TEQ notification Dated १४/०२/२०२२ |
| २ | शल्यचिकित्साशास्त्र | २ | |
| ३ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ | |
| ४ | शरिरविकृतीशास्त्र | १ | |
| ५ | क्ष- किरणशास्त्र | १ | |
| ६ | इर्मजन्सी मेडिसीन | १ | |
| | एकूण | ०८ | |

सहाय्यक प्राध्यापक-

| अ.क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता, अनुभव |
|---|---|---|---|
| १ | शरिरक्रियाशास्त्र | ०१ | *As per NMC TEQ notification Dated १४/०२/२०२२ |
| २ | औषधशास्त्र | ०२ | |
| ३ | न्यायवैद्यकशास्त्र | ०१ | |
| ४ | रोगप्रतिबंधक व सामाजिक औषधवैद्यकशास्त्र | ०१ | |
| ५ | औषधवैद्यकशास्त्र | ०४ | |
| ६ | क्षयरोग व उररोगशास्त्र | ०१ | |
| ७ | कान, नाक व घसाशास्त्र | ०१ | |
| ८ | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | |
| ०९ | क्ष- किरणशास्त्र | ०२ | |
| १० | इर्मजन्सी मेडिसीन | ०२ | |
| | एकूण | १६ | |

*** NMC TEQ ३०/०६/२०२५ उपलब्ध झाले असून, ते लागू करण्याबाबत मा. संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई कार्यालयाशी पत्रव्यवहार केला आहे. परंतु अद्याप त्या पत्रास उत्तर आलेले नाही. तरी पत्र व्यवहारास मान्यता मिळाल्यास शैक्षणिक पात्रता NMC TEQ ३०/०६/२०२५ नुसार ग्राह्य धरण्यात येईल.**

**कनिष्ठ निवासी - १ कनिष्ठ निवासी - २ कनिष्ठ निवासी - ३**

रिक्त जागांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार माननीय अधिष्ठाता यांना राहतील. रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तदनंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात असून, कोणतीही पूर्व सुचना न देता तात्पुरती कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच कनिष्ठ निवासी या पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांना उपलब्ध कोणत्याही विभागात काम करावे लागेल.

**शैक्षणिक अर्हता-**

| पदाचे नाव | आवश्यक शैक्षणिक अर्हता | शेरा |
|---|---|---|
| कनिष्ठ निवासी-१ | एम.बी.बी.एस पदवी उत्तीर्ण व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे कायम नोंदणी असणे आवश्यक. | |
| कनिष्ठ निवासी-२ | एम.बी.बी.एस पदवी उत्तीर्ण व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे कायम नोंदणी असणे आवश्यक. तसेच एकाच विभागामध्ये कनिष्ठ निवासी-१ या पदावरील एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |
| कनिष्ठ निवासी-३ | एम.बी.बी.एस पदवी उत्तीर्ण व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे कायम नोंदणी असणे आवश्यक. तसेच एकाच विभागामध्ये कनिष्ठ निवासी-१ या पदावरील दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |

**वेतन श्रेणी**

| अ.क्र. | पदनाम | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | चिकित्सालयीन -सातारा | २,००,०००/- |
| २ | सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन -सातारा | १,८५,०००/- |

तसेच सहायक प्राध्यापक या पदासाठी मानधन ठोक रक्कम रु. १,००,०००/- राहिल.

स्थानिक निवड मंडळाच्या शिफारशीनुसार कनिष्ठ निवासी १ २ ३ या पदावर निवड झालेल्या उमेदवाराला मासिक वेतन (वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार देय व अनुज्ञेय असलेली इतर भत्ते) अदा करण्यात येईल.

**आवश्यक प्रमाणपत्रे** - अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१. एमबीबीएस ची सर्व गुणपत्रे व प्रयत्न प्रमाणपत्र, आंतरवासिता प्रमाणपत्र, पासिंग व डिंग्री प्रमाणपत्र.
२. एम.डी/एम.एस/डीएनबी परीक्षा गुणपत्रिका, पासिंग प्रमाणपत्र, डिग्री प्रमाणपत्र
३. एम.बी.बी.एस व एम डी./एम.एस. पदवी/पदविका एमएनसी नोंदणी प्रमाणपत्र तसेच आवश्यक असल्यास नोंदणीचे नुतनीकरण.
४. बंधपत्र प्रमाणपत्र.
५. अनुभव प्रमाणपत्र.
६. मागासवर्गीय उमेदवारांसाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र
७. विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, इमाव, विमाप्र, साशैमाव तसेच आदुघसाठी प्रचलित शासकीय नियमानुसार वैधता असलेले उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र आवश्यक.
८. जन्म तारखेचे प्रमाणपत्र.
९. नावात बदल असल्यास गॅझेटची प्रत.
१०. आधार कार्ड व पॅन कार्डची प्रत.

अटी व शर्ती-

१. उपरोक्त पदासाठीचे निकष खालीलप्रमाणे -
पदवी परीक्षेच्या (एमडी/एमएस/एमसीएच/डीएम/किंवा समतुल्य अर्हता) प्राप्त परीक्षेच्या गुणांवर गुणवत्ता यादी लागेल तसेच शा.वै. महाविद्यालय व खाजगी महाविद्यालयातील उमेदवारांना, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता असणाऱ्या उमेदवारांस व एकाच विषयात कनिष्ठ निवासी या पदावर अधिक काळ काम केल्याचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल.

२. निवड झालेल्या उमेदवारास छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा संस्थेतील कोणत्याही संलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल व तेथे काम करावे लागेल.

३. आपल्या नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण रुग्णालयीन कामाकरीता २४ तास उपलब्ध राहणे बंधनकारक राहील.

४. ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असताना सतत जास्त कालावधीपर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

५. सदर पदावर कार्यरत असताना आपणास खाजगी व्यवसाय करता येणार नाही.

६. सदर नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाहीत व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील. याबाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

७. पदाचा राजीनामा देण्याकरीता एक महिन्याची पूर्वसुचना देणे आवश्यक राहील, अन्यथा नोटीस न देता पदाचा राजीनामा दिल्यास शेवटच्या एक महिन्याचे देय वेतन शासन खाती जमा करण्यात येईल.

८. भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कोणत्याही टप्प्यावर पदस्थितीमध्ये बदल होऊ शकतो.

९. अर्ज भरण्याच्या प्रक्रीयेची माहिती (www.gmcsatara.org) या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१०. निवड प्राप्त उमेदवारांना आपत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने सेवा करणे बंधनकारक राहील.

११. मुलाखतीचे व नियुक्तीचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांना राहतील

**टीप**- सदर माहिती मधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पूर्णपणे रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सातारा

(डॉ. विनायक काळे)
अधिष्ठाता,
छत्रपती संभाजी महाराज शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय, सातारा.

प्रति,

१. उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

२. सुचनाफलक अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

३. अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, पुणे, सोलापुर, कोल्हापुर, अंबाजोगाई, लातुर, मिरज, नांदेड, अकोला, यवतमाळ, नागपुर, धुळे, औरंगाबाद, चंद्रपुर, गोंदिया, बारामती, सिंधुदुर्ग, अलिबाग, उस्मानाबाद, परभणी, रत्नागिरी, नंदूरबार, जळगाव,

४. रोखपाल, रोखपाल शाखा, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा यांना आदेशित करण्यात येते की, कनिष्ठ निवासी उमेदवारांकडून (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातुन जाहिरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

<u>प्रत-</u>

१. मा.सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर

३. मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई